# महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजना

## सरपंच /उपसरपंच/ग्रामपंचायत सदस्य/ग्रामसवेक व ग्रामरोजगारसेवक यांनी मग्रारोहयोची अंमलबजावणी करण्याकरिता लक्षात ठेवावयाच्या प्रमुख बाबी

१) ग्रामपंचायत मार्फत कामे ५० % ते १०० % कामे होऊ शकतात

२) हजेरी पटाचे ग्रामसभेत नियमित वाचन करणे आवश्यक आहे.

३) प्रत्येक झालेल्या कामाचे सामाजिक अंकेक्षण करणे आणी विहित प्रपत्रात ग्रामपंचायतीने माहिती देणे बंधनकारक आहे.

४) शक्यतो बँकेमार्फत मजुरी देण्यात यावी.

५) हजेरी पटाची वेळोवेळी ग्रामसेवक/ सरपंच/ दक्षता समिती यांनी पाहणी/ तपासणी करावी.

६) प्रत्येक कामाचे प्राकलन तयार करुन त्यास तांत्रिक मंजुरी, प्रशासकिय मंजुरी घेण्यात यावी, प्रत्येक कामाचे मुल्याकन व पुर्णत्वाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

७) प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत ८० % कामे जलसंधारण व २० % इतर कामे घेण्यात यावी.

८) ६० % खर्च अकुशल कामावर व ४०% खर्च कुशल कामावर करता येतो.

९) प्रत्येक कुटुंबांतील एका व्यक्तीस ५ कि.मी चे आंत काम देण्यात यावे.

१०) बी.पी.एल./एस.सी./एस.टी./ इंदिरा आवास चे लाभार्थी यांचे शेतात किंवा परसबागेत सिंचन/ फळबाग व भुसुधाराची कामे घेता येतात.

११) प्रत्येक ग्रामपंचातीने कमीतकमी २ कामे २५ डिसेंबर पासून सुरु करणे बंधनकारक आहे.

१२) ग्रामपंचायत क्षेत्रातील घ्यावयाचे कामाची ओळख करुन घेणे त्या कामास ग्राम सभेची मान्यता प्राप्त करुन घेणे व त्या कामाची अंमलबजावणी व पर्यवेक्षण करणे.

१३) ग्रामपंचायत, ग्रामसभेच्या शिफारशी वरुन त्यांचे ग्रामपंचायत क्षेत्रापुर्ती कामाचे नियोजन करुन विकास आराखडा तयार करावा. मजुर कुटुंबाचे मागणीचा अंदाज घेवुन त्यांना द्यावयास लागणारे काम कमाल १०० दिवस पुरेल असे असावे. याकरिता कामे तयार ठेवण्याची ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे.

१४) ग्रामपंचायत क्षेत्रातील कामाची देखरेख ग्रामसभा करु शकेल.

१५) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत एका कुटुंबाला १०० दिवस काम दिले जाते व त्यावर प्रती मजूर दर हा ६८/- रुपये प्रमाणे ६८००/- अकुशल कामावर तसेच ६० % खर्च व ४०% रुपये प्रमाणे ४५३३/- खर्च कुशल कामावर असे मिळुन एकुण ११,३३३/- एका व्यक्तीवर आर्थिक वर्षात खर्च करता येतात.